**प्रेसनोट** **दिनांक १५/०३/२०१९**

**खडक पोलीस स्टेशन**

**लॅपटॉपसह रिक्षामध्ये विसरलेल्या, बॅगमालकाचा शोध घेऊन बॅग मुळमालकास सुखरुप परत.**

दिनांक १५/०३/२०१९ रोजी १६.०० वा. चे सुमारास रिक्षाचालक नामे श्री. महादेव आबाजी कोलते, रा. फडगेट पोलीस चौकीसमोर, शुक्रवार पेठ, पुणे यांनी खडक पोलीस ठाणे येथे येऊन कळविले की, त्यांचे रिक्षामध्ये बसलेल्या एका प्रवाशाची बॅग ते रिक्षामध्येच विसरुन निघुन गेलेले आहेत. त्यावेळी खडक पोलीस ठाणेकडील ठाणे अंमलदार - स.पो.नि. श्री. मगर, मपोशि शिल्पा पवार, मपोशि फराटे यांनी तात्काळ सदर बॅगची तपासणी केली असता, त्यामध्ये एक लॅपटॉप व महत्वाची कागदपत्रे दिसुन आली. सपोनि श्री. मगर व नमुद कर्मचारी यांनी बॅगेमधील कागदपत्रावर नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता, इसम नामे सुनिल बाळकृष्ण कुलकर्णी, रा. शिरवळ, जि. सातारा यांनी फोन उचलुन, सदर बॅग त्यांचीच असुन, धावपळीमध्ये बॅग रिक्षामध्ये विसरली असल्याचे सांगितले. श्री. सुनिल कुलकर्णी हे खडक पोलीस ठाणे येथे आले असता, सदर बॅगबाबत त्यांच्याकडे खातरजमा करुन, नमुद बॅग लॅपटॉपसह त्यांच्या ताब्यात देण्यात आलेली आहे. रिक्षाचालक यांच्या प्रामाणिकपणाबद्द्ल व पोलीसांचे तत्परतेबद्द्ल श्री. कुलकर्णी यांनी आभार व्यक्त केले.

ता. १५/०३/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

